आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० ऑगस्ट २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा

- ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही सेनादलांमधल्या समन्वयाचं आणि कार्यान्वयन एकात्मकतेचं उदाहरण असल्याचं संरक्षण दलप्रमुखांचं प्रतिपादन

- भारताला हवाई क्षेत्र वापरायला बंदी घातल्यापासून १२७ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याची पाकिस्तानची कबुली

**आणि**

- चीनमध्ये सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेच्या तिरंदाजी प्रकारात भारताच्या ऋषभ यादवची कांस्य पदकाची कमाई

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या कर्नाटक दौऱ्यात पुणे ते अजनी रेल्वे स्थानकादरम्यानच्या वंदे भारत रेल्वेचे दूरस्थ पद्धतीनं लोकार्पण केलं. बंगळुरूच्या केएसआर रेल्वे स्थानकावरून प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुणे ते अजनी, बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते कटरा माता वैष्णोदेवी या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर रेल्वे स्थानकावरून या समारंभात सहभागी झाले. अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून ८८१ किमी अंतर कापणारी ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत आहे. ही जलदगती गाडी ७३ किलोमीटर प्रतितास वेगाने धावेल आणि नागपूर ते पुणे दरम्यान १० थांबे घेईल, या रेल्वेला शेगाव इथंही थांबा देण्यात आला आहे, असं मध्य रेल्वेने आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलं आहे.

**<><><><>**

देशात नागपूर-पुणे ही सर्वाधिक अंतराची वंदे भारत रेल्वे सुरु झाली असून त्यामुळे वेळेची मोठी बचत होऊन विदर्भातल्या लोकांना पुण्याशी जोडलं जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर अजनी पुणे या वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटनाप्रसंगी

नागपूर रेल्वे स्थानकावर मुख्यमंत्री उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ज्या प्रवासाला आधी १६ ते १७ तास लागत होते ते अंतर केवळ आता बारा तासात कापणं शक्य होणार असून त्यासाठी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले. सध्या अहिल्यानगर वरुन रेल्वेगाडी दौन्डला जाऊन नंतर पुण्याला जाते, यामुळे नगर ते पुणे असा रेल्वेमार्ग तयार झाल्यास वेळेची बचत होईल तसंच अंतर देखील कमी होईल, यासाठी मध्य रेल्वेच्या प्रमुखांशी सकारात्मक चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी दिल्लीत संसद सदस्यांसाठी बांधलेल्या १८४ निवासस्थानांचं उदघाटन होणार आहे. बाबा खरक सिंह मार्गावरच्या या संकुलात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सिंदूर वृक्षाचं रोपही लावलं जाणार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून असणारी जबाबदारी अधिक कार्यक्षमतेने सांभाळता यावी, या दृष्टीनं या संकुलात सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**<><><><>**

आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या रविवारी येत्या ३१ तारखेला सकाळी अकरा वाजता नागरीकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२५ वा भाग असणार आहे. यात जनतेला आपले विचार पोहोचवण्याची संधी असून यासाठी नि:शुल्क दुरध्वनी क्रमांक १८००- ११ - ७८०० याचा उपयोग करता येईल.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही सेनादलांमधल्या समन्वयाचं आणि कार्यान्वयन एकात्मकतेचं उदाहरण आहे, असं संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. ते आज सिकंदराबाद इथं संरक्षण व्यवथापन महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. सशस्त्र दलांमध्ये एकत्र कृतीसाठी आवश्यक धोरणात्मक दृष्टिकोन आणि भविष्यातल्या रुपरेषेबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. याशिवाय सध्याच्या तंत्रज्ञानावर आधारित युगात व्यापक क्षमता विकास, आत्मनिर्भरता

आणि संरक्षण क्षेत्रातल्या परिवर्तनात्मक बदलांचं ज्ञान असणं ही काळाची गरज आहे, असं ते म्हणले.

<><><><>

पाकिस्ताननं भारताला त्यांचं हवाई क्षेत्र वापरायला बंदी घातल्यापासून पाकिस्तानचं १२७ कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. पाकिस्तानच्या राष्ट्रीय असेम्ब्लीमध्ये गेल्या आठवड्यात ही माहिती देण्यात आली. पाकिस्ताननं २४ एप्रिल पासून त्यांचं हवाई क्षेत्र वापरायला भारताला प्रतिबंध केला आहे. भारतानं देखील अशाच प्रकारची बंदी घातली असून भारताचं सार्वभौमत्व आणि सुरक्षा यापुढे कोणतंही नुकसान मोठं असू शकत नाही, असं भारतानं म्हटलं आहे.

<><><><>

सर्वोच्च न्यायालयानं उत्तर प्रदेशातल्या वृंदावन इथल्या बांके बिहारी मंदिराचं दैनंदिन कामकाज आणि देखरेख यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती अशोककुमार यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन केली आहे, मंदिर न्यास अध्यादेशाला अलाहाबाद उच्च न्यायालयात घटनात्मक आव्हान देण्यात आलं असून याप्रकरणी निर्णय येईपर्यंत ही उच्चाधिकार समिती मंदिराचं कामकाज सांभाळेल.

<><><><>

चीनमध्ये चेंगदू इथं सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेत तिरंदाजी प्रकारात भारताच्या ऋषभ यादवनं कांस्य पदक पटकावलं आहे. दहाव्या मानांकित ऋषभनं उत्तम कामगिरी करत अनेकवेळा सुवर्णपदक जिंकलेल्या अभिषेक वर्माचा प्रभाव केला. महिलांच्या कंपाऊंड प्रकारात, मात्र भारताच्या परणीत कौर आणि मधुरा धामणगावकर यांचं आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आलं. दर चार वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत यंदा भारतीय खेळाडू तिरंदाजी, बिलियर्ड्स, रोलर स्केटिंग, वुशु आणि रॅकेटबॉल पाच खेळांमध्ये सहभागी होत आहेत.

<><><><>

बिहारमध्ये सुरु असलेल्या वीस वर्षांखालील रग्बी स्पर्धेत पुरुषांच्या श्रेणीत चीनचा पराभव करुन श्रीलंकेनं अंतिम फेरीत धडक मारली आहे. श्रीलंकेच्या संघानं उपांत्य फेरीत दमदार खेळ करत २६-१७ अशा फरकानं चीनवर मात केली.

<><><><>

आशियाई  सर्फिंग स्पर्धेत रमेश बुधियाल हा या क्रीडाप्रकारात पुरुषांच्या खुल्या श्रेणीत पदक मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. त्यानं आज या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं.

<><><>

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्याच्या हरसिल आणि धराली भागांत अलिकडेच झालेल्या दुर्घटनेनंतर, अजुनही मोठ्या प्रमाणावर मदत, बचाव आणि शोधकार्य सुरू आहे. बचाव कार्यासाठी उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरण आणि भारतीय लष्कराच्या हेलिकॉप्टरनी एकूण २५७ उड्डाणं केली असून, या दुर्घटनेनंतर, आतापर्यंत अकराशे पेक्षा जास्त लोकांना सुरक्षित बाहेर काढलं आहे. वीज, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचा नियमित पुरवठा सुरू केला गेला आहे, रस्ते बंद असल्यानं घोड्यांवरून खाद्यान्न पुरवठा केला जात आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयानं काम करावं तसंच मदत कार्याचा वेग आणि परिणामकारता वाढवण्यासाठी बाधित क्षेत्रांची विभागणी करावी असे निर्देश उत्तराखंडच्या मुख्य सचिवांनी दिले आहेत. या दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी भूगर्भशास्त्रज्ञांची पथकंही उत्तरकाशी आणि पौरी जिल्ह्यांमध्ये पाठवली गेली आहेत. ही पथकं एका आठवड्यात आपला अहवाल सादर करतील.

<><><>

जम्मू काश्मीरच्या किश्तवार जिल्ह्यात आज सकाळी दल भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक उडाली. या भागात अतिरेकी असल्याची माहिती खबऱ्यांकडून मिळाल्याचं वृत्त आहे. या भागात दोन्ही बाजूंकडून गोळीबार सुरु आहे.

<><><>

बिहारमधल्या सर्व नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या बूथ स्तरावरच्या एजंटना मतदारयाद्या पुनरिक्षणचा भाग म्हणून अद्ययावत मतदार याद्यांचा मसुदा  देण्यात आल्याचं, भारतीय निवडणूक आयोगानं सांगितलं आहे. या मसुद्यात मृत, स्थलांतरित आणि बोगस मतदारांचा समावेश असून बूथ एजंटनी या नावांबाबत हरकत घेणारं पत्र पुराव्यासह बूथ अधिकाऱ्याकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बूथ अधिकारी या पुराव्यांची पडताळणी करून याद्या अद्ययावत करतील.

<><><>

रशिया - युक्रेन युद्ध समाप्तीसाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या क्षेत्रीय अदलाबदल प्रस्तावानंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेंस्की यांनी युक्रेनची कोणतीही जमीन रशियाकडे सुपूर्द करण्यास ठाम नकार दिला आहे.

//<><><><>//